**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.शितल महादेव वाली
ए/३, सुयोग भवन, नागाळा पार्क, बावडा रोड,
कोल्हापूर, जि. कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षण सह-संचालक, उच्च शिक्षण, कोल्हापूर विभाग,
राजाराम कॉलेज, कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्राचार्य, शहाजी विधी महाविद्यालय,
शाहुपूरी, कोल्हापूर, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७७ / कोल्हापूर /२००६ |
| २ | सुनावणीची तारीख(विशेष अपील निर्गत मोहीम) | दि.१३.५.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.शितल महादेव वाली
ए/३, सुयोग भवन, नागाळा पार्क, बावडा रोड, कोल्हापूर, जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षण सह-संचालक, उच्च शिक्षण, कोल्हापूर विभाग,
राजाराम कॉलेज, कोल्हापूर

**जन माहिती अधिकारी** तथा प्राचार्य, शहाजी विधी महाविद्यालय,
शाहुपूरी, कोल्हापूर, जि.कोल्हापूर प्रा.यु.टी.पोवार

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १६.११.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १.३.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ६.२.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १६.१०.२००६ |

**मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

८ ऑक्टोबर २००४-२००५ मधील कायदा अभ्यासक्रमाच्या तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या हजेरीच्या प्रमाणाविषयाची व त्यासंबंधातील अन्य माहिती. तसेच किती प्राध्यापक या बॅचला शिकविण्यास होते व त्यांना किती भत्ता दिला.

## विवेचन

ऑक्टोबर २००४-०५मधील कायदा अभ्यासक्रमाच्या तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या हजेरीच्या प्रमाणाविषयाची व त्यासंबंधातील अन्य माहिती अपीलकर्ता श्री.शितल महादेव वाली यांनी जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, शहाजी विधी महाविद्यालय, शाहुपूरी, कोल्हापूर यांच्याकडे मागितली होती. प्राचार्यांनी ही माहिती कळविली. प्राध्यापकांविषयी झालेल्या खर्चाची माहिती आपल्याला दिली गेली नाही, म्हणून श्री.वाली यांनी अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे अपील केले, परंतु त्यांनी मूळ निर्णय कायम केला. त्याविरुध्द श्री.वाली यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

कोल्हापूर येथील विशेष अपील निर्गत कार्यक्रमात दि.१३.५.२००८ रोजी या अपिलाचा समावेश करण्यात आला होता. प्राध्यापकांच्या पगाराबद्दलची माहिती चुकीची व विद्यार्थ्यांच्या उपस्थितीबद्दलची माहिती अपुरी असल्याचा मुद्दा कायम असल्याचे श्री.वाली यांनी सर्व संबंधितांनी सादर करावयाच्या नमुनापत्रात नमूद केले. परंतु नेमकी कोणती माहिती चुकीची व अपुरी आहे हे पुराव्यानिशी त्यांनी निवेदनामध्ये वा कोणत्याही कागदपत्राद्वारे सिध्द केलेले नाही. एकाच विषयावर त्यांनी अनेक अर्ज केले असून त्यांना माहिती देण्यात आल्याचे सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसते.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ३१.५.२००८**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,
चौथा मजला, कौंसिल हॉलसमोर,
पुणे : ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.२६.०५.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपीलाचा समावेश होता :

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७७७ /पुणे |
| २ | अपीलकर्ता | श्री.गोपीनाथ सखाराम अवसरे,<br>१/४९, ठोकरशी जिवराज बिल्डींग, ठोकरशी जिवराज रोड, शिवडी, मुंबई ४०० ०१५ |
| ३ | जन माहिती अधिकारी | तहसीलदार, तहसील कार्यालय, हवेली, जि.पुणे |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | उपविभागीय अधिकारी, हवेली उपविभाग, पुणे<br>जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे |

अपीलकर्ता श्री. गोपीनाथ सखाराम अवसरे यांनी मौजे अवसरेनगर येथील गट क्र. ३०८ च्या वहिवाट व मालकी हक्काबाबत, तसेच त्यांच्या दि. २०.२.२००२ च्या अर्जावर करण्यात आलेल्या कार्यवाहीविषयी माहिती मागितली होती.

सदर अपील हे अपिलीय प्राधिकारी म्हणून दिलेल्या निर्णयाविरूध्द नसून तहसीलदार, हवेली यांनी दिलेल्या अर्धन्यायिक प्रकरणात दिलेल्या आदेशाविरूध्द आहे. सदर आदेशाविरूध्द उपविभागीय अधिकारी, हवेली उपविभाग, पुणे यांच्याकडे अपील करण्याबाबत अपीलकर्त्याने मान्य केले आहे. त्यानुसार अपीलकर्त्याने तहसीलदार यांचे निर्णयावर अपील उपविभागीय अधिकारी, हवेली उपविभाग, पुणे यांच्याकडे दाखल करणे उचित ठरेल.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. ३१.५.२००८**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

क्र. ८२

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.दिलीप अशोक देसाई
ए-२२, सरगम विहार अपार्टमेंट,
नागाळा पार्क, कोल्हापूर-४१६००३ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका,
कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक आयुक्त क्र.२,
कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८२ / कोल्हापूर / २००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१३.५.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.दिलीप अशोक देसाई
ए-२२, सरगम विहार अपार्टमेंट,
नागाळा पार्क, कोल्हापूर-४१६००३

**अपिलीय प्राधिकारी** तथा आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका,
कोल्हापूर श्री.कुणालकुमार

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक आयुक्त क्र.२,
कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर श्रीमती शिल्पा नाईक

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २०.३.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १.५.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २७.४.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १९.७.२००६ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>कोल्हापूर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील खुल्या जागा, जमिनी ज्या जागेवर महानगरपालिकेचे नियंत्रण आहे अशा जमिनी महानगरपालिकेने ज्या व्यक्ती किंवा ज्या व्यक्ती किंवा संस्थांना मोफत, सवलतीने किंवा लीजवर दिल्या आहेत त्याचा सन १९८५ पासूनचा संपूर्ण तपशील (दिलेल्या तक्त्यानुसार) | |

## विवेचन

कोल्हापूर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील लीजवर वा मोफत अथवा सवलतीच्या दरात दिलेल्या जमीनी, त्यावरील बांधकाम याबाबतची माहिती अपीलकर्ता श्री.दिलीप अशोक देसाई यांनी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त क्र.२, कोल्हापूर महानगरपालिका यांच्याकडे मागितली होती. त्यांनी माहिती नाकारली, म्हणून श्री.देसाई यांनी अपिलीय प्राधिकारी तथा आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका यांच्याकडे अपील केले. माहिती देण्याचा आदेश देऊन अपिलीय प्राधिका-यांनी अपील निकाली काढले. उपलब्ध अभिलेखाप्रमाणे माहिती देण्यात आली परंतु ती माहिती अपुरी व दिशाभूल करणारी असल्याच्या कारणावरुन श्री.देसाई यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले.

दि.१९.३.२००८ रोजी पुणे येथे झालेल्या विशेष अपील निर्गत कार्यक्रमात या अपिलाचा समावेश होता. परंतु अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी गैरहजर राहिले व अपिलीय प्राधिकारी यांनी पत्र दिले, परंतु प्रतिनिधी पाठविला नाही, या कारणास्तव सदरचे अपील निकाली काढण्यात आले होते. यावर अपिलीय प्राधिकारी यांनी सुनावणी पुढे ढकलली असल्याचे पत्र आपल्याला दिले. त्यामुळे आपल्याला सदर सुनावणीस हजर राहता आले नाही, यामुळे पुन्हा सुनावणी घेण्यात यावी, अशी विनंती अपीलकर्ता श्री.देसाई यांनी दि.१५.४.२००८ रोजीच्या (प्राप्त दि.२२.४.२००८) पत्रान्वये केली. त्यांची ही विनंती मान्य करण्यात येऊन दि.२९.३.२००८ चा आयोगाने दिलेला

निर्णय रद्द करण्यात येऊन, दि.१३.५.२००८ रोजी अपिलाची सुनावणी घेण्यात आली.

श्री.देसाई यांनी विशिष्ट नमुना सादर त्यानुसार दि.१ जानेवारी १९८५ ते ३१ डिसेंबर २००५ या २१ वर्षांमधील माहिती मागितली होती. माहिती विस्तृत स्वरुपाची असल्याने आणि श्री.देसाई यांनी नमूद केलेल्या नमुन्यात अभिलेखात नसल्याने देणे शक्य नसल्याचे जन माहिती अधिकाऱ्यांनी श्री.देसाई यांना कळविले. मात्र संबंधित अभिलेख पाहण्यासाठी उपलब्ध करुन देता येतील असेही त्या पत्रात नमूद केले. श्री.देसाई यांनी केलेल्या अपिलावर प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी सात दिवसात माहिती देण्याचा आदेश जन माहिती अधिकाऱ्यांना दिला. त्यानुसार माहिती देण्यात आली, परंतु त्यात दोन संस्थांच्या संदर्भातील तपशील देण्यात आला नाही व जमिनीचे क्षेत्र दिलेल्या कारणासाठीच उपयोगात आणले जाते की नाही याची माहिती दिलेली नाही असे श्री.देसाई यांनी आयोगापुढील सुनावणीत लेखी व तोंडी नमूद केले. माहितीची मागणी करणारा अर्ज दि.२०.३.२००६ रोजी केला होता. जन माहिती अधिकाऱ्यांनी दि.१५.५.२००६ रोजी उत्तर दिले. मागितलेली माहिती व्यापक व संकलित करुन द्यावी लागणारी असल्याने, तसेच मार्च महिन्याच्या अखेरचा कालावधी असल्यामुळे अन्य कामाचा ताण होता. तसेच २१ वर्षांच्या दीर्घ कालावधीतील माहिती संकलित करण्यासाठी प्रमाणाबाहेर साधनसामग्री वळवावी लागणार असल्यामुळे उत्तर पाठविण्यास विलंब झाला. मात्र माहिती नि:शुल्क दिली, असे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त क्र.२, कोल्हापूर महानगरपालिका श्रीमती शिल्पा नाईक व अपिलीय प्राधिकारी तथा आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका श्री.कुणालकुमार यांनी नमूद केले. विस्तृत माहिती असल्यामुळे अभिलेख पाहणी करण्याचा प्रस्ताव श्री.देसाई यांच्यापुढे ठेवण्यात आला होता, परंतु त्यांनी त्याप्रमाणे पाहणी केली नाही. मात्र अशी पाहणी करावयास गेल्यास काही बांधकाम व्यावसायिकांना आधीच माहिती मिळते व आपल्याला धमक्या येण्यासारखे प्रकार घडतात, असे श्री.देसाई यांनी नमूद केले. असे प्रकार आपल्या निदर्शनास आणल्यास आपण योग्य ती कारवाई करु, असे प्रतिपादन श्री. कुणालकुमार यांनी केले.

अपीलकर्त्याच्या मूळ अर्जातील उत्तर विहित मुदतीत द्यावयास पाहिजे होते, हे जन माहिती अधिकाऱ्यांनीही मान्य केले, मात्र आर्थिक वर्षाअखेरीच्या कामामुळे विलंब झाला हे त्यांनी

विस्ताराने केलेले स्पष्टीकरण मान्य करण्यात येत आहे. अपीलकर्त्यानेही त्याबाबत सहमती दर्शविली. उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे व निवेदने पाहता खालील निष्कर्ष निघतात :

(१) दोन संस्थांच्या बाबतीतील तपशील दिला नसल्याचे अपीलकर्त्याचे म्हणणे रास्त आहे. हा तपशील दिला जाणे आवश्यक आहे.

(२) अपीलकर्त्याने मागितलेली माहिती २१ वर्षांमधील व सर्वसमावेशक अशा स्वरुपाची आहे. विशिष्ट जागांबाबतची नेमकी माहिती मागितल्यास देणे सोयीचे होईल, हे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचे म्हणणे रास्त आहे.

वरील बाबी लक्षात घेता आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे ::

## आदेश

(१) अपील अमान्य.

(२) माहितीतील द्यावयाचा राहिलेला तपशील अपीलकर्त्यास चार दिवसात निःशुल्क देऊन जन माहिती अधिकाऱ्यांनी आयोगाला पूर्तता अहवाल सादर करावा, असे आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिले होते. त्यानुसार कार्यवाही करावी.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

पुणे
दि. ३०.५.२००८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्रीमती ज्योती चंद्रकात निकाळजे
१२, मानसी, २६६/३, नचिकेत पार्क,
बाणेर रस्ता, पुणे-४११ ०४५

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, सातारा

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८४१ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ११.१०.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्रीमती ज्योती चंद्रकात निकाळजे,
१२, मानसी, २६६/३, नचिकेत पार्क,
बाणेर रस्ता, पुणे-४११ ०४५

**अपिलीय प्राधिकारी** तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, सातारा श्री.टी.आर.गारळे

**जन माहिती अधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
श्री. उदयसिंह आ. भोसले

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १५.४.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २४.४.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ८.५.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २६.५.२००६ |

८ मूळ अर्जात मागणी केलेली माहिती

जिल्ह्यातील अनुदानित/विना अनुदानित शिक्षकांची विद्यालय, विषय, संवर्ग निहाय मान्यतेची जानेवारी १९९० ते दि.३१ मार्च, २००६ या कालावधीतील माहिती

## विवेचन

जानेवारी १९९० ते दि.३१ मार्च २००६ या कालावधीत शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सातारा यांनी मान्यतासाठी दिलेल्या शिक्षकांची विद्यालय, विषय व संवर्गनिहाय माहिती अपीलकर्त्या श्रीमती ज्योती चंद्रकांत निकाळजे यांनी जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सातारा यांच्याकडे मागितली होती. या स्वरुपाचा पहिला अर्ज श्रीमती निकाळजे यांनी दि.१३.४.२००६ रोजी तीन तालुक्यांची माहितीची यादी मागणारा केला व दुसरा अर्ज दि.१०.५.२००७ रोजी संपूर्ण जिल्ह्यातील माहिती मागणारा केला. दि.१०.५.२००७ च्या अर्जात सन २००१ ते एप्रिल २००७ या कालावधीतील खाजगी शिक्षण संस्थेच्या शिक्षकांच्या मान्यतेच्या वेळची सेवाज्येष्ठतेची यादी मागितली होती. ही माहिती संबंधित शाळातील मुख्याध्यापकांकडून घ्यावी, असे शिक्षणाधिकारी (माध्यमिक)सातारा, जिल्हा परिषद, सातारा यांनी श्रीमती निकाळजे यांना कळविले. त्याविरुध्द त्यानी अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सातारा यांच्याकडे अपील केले. संबंधित शाळांच्या मुख्याध्यापकांकडे अर्ज करुन माहिती घ्यावी, तेथून माहिती न मिळाल्यास शिक्षणाधिकारी (माध्यमिक)सातारा, जिल्हा परिषद, सातारा यांच्याकडे अपील करावे, असे अपिलीय प्राधिकाऱ्यानी त्यांना कळविले. त्याविरुध्द श्रीमती निकाळजे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्रीमती निकाळजे यांनी माहिती मागितली तेव्हा सातारा जिल्ह्यात अनुदानित व विना-अनुदानित अशा ५५० शाळा होत्या. ती संख्या आता ६२५ झाली आहे. एवढ्या शाळांची संपूर्ण माहिती संकलित करुन देणे त्यावेळी शक्य झाले नाही, असे जन माहिती अधिकारी श्री.उदयसिंह भोसले व अपिलीय प्राधिकारी यांचे प्रतिनिधी श्री.टी.आर.गारळे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, सातारा, जिल्हा परिषद, सातारा यांनी आयोगापुढील सुनावणीत सांगितले.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुकताच अस्तित्वात आला असल्यामुळे, तसेच शाळांची संख्या लक्षात घेता श्रीमती निकाळजे यांचा अर्ज सर्व संबंधित शाळांकडे पाठविला नाही, असेही त्यांनी नमूद केले.

अपीलकर्तीने उपस्थित राहून अथवा लेखी स्वरुपात कोणतेही निवेदन केलेले नाही.

मागितलेली माहिती अत्यंत विस्तृत स्वरुपातील आहे. तसेच त्या त्या विभागाकडून अपीलकर्तीने ती घेणे कार्यवाहीच्या दृष्टीने अधिक उचित ठरेल, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्या निवेदनावरुन व सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येते.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अमान्य.

(२) अपीलकर्तीने संबंधित विद्यालयांकडून आवश्यक माहिती मागावी. देय माहिती १५ दिवसात देण्याचा आदेश अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक)सातारा, जिल्हा परिषद, सातारा यांनी संबंधित विद्यालयांना द्यावा. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी याबाबतचा पूर्तता अहवाल आयोगाला सादर करावा.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ६.५.२००८**
**मे-२००८**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१.

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. १३.५.२००८ रोजी कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८८ / कोल्हापूर |
| २ | अपीलकर्ता | श्री. शरद निळकंठराव मिराशी<br>२८, डॉ. घाटगे कॉलनी, कदमवाडी रोड, कोल्हापूर |
| ३ | जन माहिती अधिकारी | उपशहर अभियंता, विभागीय कार्यालय क्र.४<br>कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर |
| ५ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>घर क्र.२०४ ख,ई, २६ पाटणकर कॉलनी, कोल्हापूर येथे श्रीमती शेवंताबाई भिवाजी चौगुले यांना दि. २३.५.२००६ ने जा.क्र.प.व.डी./वि.का.४/४३/०६/०७ ने दिलेल्या नोटिसीबाबत | |

अपीलकर्त्याने जून २००७ मध्ये माहिती मिळाली असून अपील निकाली काढावे असे वरील तीनही घटकांमध्ये झालेल्या चर्चेत नमूद केले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. ३१ .५.२००८**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. १३.५.२००८ रोजी कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९३/ कोल्हापूर |
| २ | अपीलकर्ता | सौ. रेवती रमाकांत भोसले<br>प्लॉट क्र.९४, माधूरी रेसिडेन्सी, दुसरा मजला,<br>शिवाजी पार्क, कोल्हापूर- ४१६ ००१ |
| ३ | जन माहिती अधिकारी | उपशहर अभियंता, विभागीय कार्यालय क्र.४<br>कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर |
| ५ | <u>मूळ अर्जात मागणी केलेली माहिती</u><br>माधुरी रेसिडेन्सी, कोल्हापूर येथील इमारतीच्या बांधकामाबाबत अधिकारी/कर्मचाऱ्यांची नावे | |

वरील तीनही घटकांमध्ये झालेल्या चर्चेनुसार अपीलकर्त्याने अर्जात मागितलेल्या अधिकाऱ्यांची नावे दोन दिवसांत प्राप्त करून देण्याचे जन माहिती अधिकाऱ्यानी मान्य केले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. अपीलकर्त्याच्या मागणीनुसार माहिती अर्जात मागितलेल्या अधिकाऱ्यांची नावे उपलब्ध करून दिल्याचा पूर्तता अहवाल आयोगाला हा आदेश मिळाल्यापासून आठ दिवसांत सादर करावा.

**पुणे**
**दि. ३१ .५.२००८**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. शंकर धाकुजी सोनवणे
एक्सल कॉर्नर, बिल्डींग नं. अे-२, फ्लॅट नं.१०५,
१, गुरुवार पेठ, सेंट तेरेसा चर्चसमोर, पुणे-४११ ०४२ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता,
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उप अभियंता,
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९४ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ११.१०.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. शंकर धाकुजी सोनवणे, एक्सल कॉर्नर, बिल्डिंग नं. अे-२, फ्लॅट नं.१०५, १, गुरुवार पेठ, सेंट तेरेसा चर्चसमोर, पुणे-४११ ०४२

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, पुणे
श्री. सतीश आडिवरेकर
**जन माहिती अधिकारी** तथा उप अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, पुणे
सौ. आर.एस. पवार

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २१.४.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३.५.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २६.५.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १.६.२००६ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

पत्र क्र. परिमंडळ-१/या.ता./११०३ दि. ३१.३.२००६ अन्वये मानीव तारीख मंजूर करण्यासाठी प्रकरण मध्यवर्ती कार्यालयास सादर केले आहे, त्याच धर्तीवर ज्या सर्व कर्मचाऱ्यांना मानीव तारखा दि. ९.३.१९८१ ते २१.४.२००६ या कालावधीत मंजूर केल्या आहेत याबाबतची विवरणपत्रातील रकान्यात माहिती, तसेच अर्ज, आदेश व पत्र यांच्या छायांकित प्रती

## विवेचन

अपीलकर्ता श्री.शंकर धाकुजी सोनावणे यांनी ज्येष्ठतेनुसार मानीव तारीख मिळण्याबाबत माहितीच्या अधिकाराखाली जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, पुणे यांच्याकडे मागणी केली होती. त्या संदर्भात समाधानकारक माहिती न मिळाल्यामुळे श्री.सोनावणे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, पुणे यांच्याकडे अपील केले होते. तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, पुणे श्री.सु.शं.गोहाड यांनी अपील अमान्य केल्यामुळे श्री.सोनावणे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे. मागितलेल्या माहितीसाठी घेतलेले जादा शुल्क सुमारे १५ महिने परत न केल्यामुळे या रकमेचे व्याज मिळावे, अशी मागणी आयोगाकडील अपिलात केली आहे.

दि.९.३.१९८१ ते २१.४.२००६ पर्यंतच्या कालावधीत मानीव तारीख मंजूर केलेल्या सर्व कर्मचाऱ्यांबाबतची माहिती श्री.सोनावणे यानी मागितली होती व त्या अनुषंगाने आपल्याला ज्येष्ठतेनुसार मानीव तारीख मिळण्याची मागणी केली होती. या व श्री.सानावणे यांनी केलेल्या अन्य अर्जांच्या अनुषंगाने त्यांना माहिती देण्यात आली असल्याचे विद्यमान अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, पुणे श्री.सतीश आडिवरेकर यांनी

कागदपत्रांसह स्पष्ट केले. माहिती देण्यासाठी आपल्याकडून घेतलेल्या शुल्कातील ऊर्वरित रक्कम रु.३९०/- दि.१५.४.२००६ ते दि.६.९.२००७ पर्यंत कार्यालयाने वापरलेली असून त्यावरील व्याज मिळावे, अशी मागणी श्री.सोनावणे यांनी अपिलात व आयोगापुढील सुनावणीतही लेखी व तोंडी केली. संबंधित रकमेचा धनादेश तयार होता, परंतु श्री.सोनावणे यांनी तो स्वीकारला नाही, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी स्पष्ट केले. माहिती मिळण्याबाबत आपली तक्रार नसल्याचे ~~त्यांनी~~ श्री सोनावणे यांनी नमूद केले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य.

(विजय कुवळेकर)
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ६.५.२००८**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.सईद अहमद मिरासाहेब हुदली
प्लॉट नं.१७ व १८, रि.स.नं.५४६, राजेंद्रनगर
ई वॉर्ड, कोल्हापूर

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक भूमी अभिलेख, जि.कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा नगर भूमापन अधिकारी, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९७ / कोल्हापूर /२००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १३.५.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सईद अहमद मिरासाहेब हुदली
प्लॉट नं.१७ व १८, रि.स.नं.५४६, राजेंद्रनगर
ई वॉर्ड, कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक भूमी अभिलेख, जि.कोल्हापूर श्री.मिलिंद चव्हाण

**जन माहिती अधिकारी** तथा नगर भूमापन अधिकारी, जि. कोल्हापूर श्री.शि.ह.भोसले

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १३.२.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. .७.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २८.६.२००६ |

| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>करवीर येथील रि.स.नं.५४६,( सि.स.नं.२९६) ई वॉर्डचे मिळकतीचा दि.६.७.२००१ रोजीचा मोजणी नकाशाच्या प्रतींसह ११ मुद्दयांची माहिती. |
|---|---|

## विवेचन

करवीर येथील मिळकतीच्या मोजणीच्या नकाशातील ११ मुद्दयांची माहिती अपीलकर्ता श्री.सईद अहमद मिरासाहेब हुदली यांनी जन माहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी, कोल्हापूर यांच्याकडे मागितली होती. परंतु ती माहिती व्यापक स्वरुपाची असल्याने ती देण्यास मुदत मिळावी अशी विनंती तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.संजय ढिकले यांनी दोन वेळा केली. मूळ अर्ज दि.१३.२.२००६ चा होता. श्री.ढिकले यांनी दि.१६.३.२००६ व दि.१.४.२००६ या पत्रान्वये मुदत मिळण्याची विनंती केली होती. या मुदतीतही माहिती न मिळाल्याने श्री.हुदली यांनी अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, कोल्हापूर यांच्याकडे अपील केले. मोजणीबाबतची धारिका उपलब्ध होत नसल्याचे जन माहिती अधिकाऱ्यांनी म्हटले होते. तीन दिवसात धारिकेचा शोध न लागल्यास फौजदारी गुन्हा दाखल करण्याचे आदेश अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, कोल्हापूर यांनी दिले. त्यानंतर दोन दिवसात संबंधित कागदपत्र मिळाले असे श्री.हुदली यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलात नमूद केले आहे.

प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या आदेशानंतर, म्हणजे आदेशाच्या दिनांकापासून १०५ दिवसांनी माहिती आपल्याला दिली गेली, ७५ दिवस विलंब झाला, असे श्री.हुदली यांनी आयोगापुढील सुनावणीत नमूद केले. या विलंबाबाबत तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.संजय ढिकले यांनी आठ दिवसात खुलासा करावा, असा आदेश आयोगाने उपस्थित अधिकाऱ्यांमार्फत सुनावणीच्या वेळी दिला होता. 'प्रचंड कामाच्या ताणामुळे माहिती देण्यास विलंब झाला,' असे श्री.ढिकले यांनी दि.१७.५.२००८ च्या (आयोगास प्राप्त दि.२१.५.२००८) पत्रान्वये नमूद केले आहे. 'मी नगर भूमापन अधिकारी, कोल्हापूर या पदावर दि.१४.५.२००४ ते ३१.५.२००६ या कालावधीत कार्यरत होतो. तसेच माझ्याकडे तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, कागल या पदाचा

अतिरिक्त कार्यभारही होता. नगर भूमापन अधिकारी या पदाचे काम फार मोठ्या प्रमाणात होते. दरमहा साधारणत: ५०० ते ६०० फेरफाराच्या प्रकरणांची आवक होती. तसेच नगर भूमापन कोल्हापूर कार्यालयास केंद्र सरकार पुरस्कृत ५० टक्के योजनेअंतर्गत अभिलेखकक्षाचे संगणकीकरण व अद्यावतीकरण या योजनेअंतर्गत प्राप्त झालेल्या अनुदानाचे अनुषंगाने कार्यालयातील अभिलेख कक्षाचे अद्यावतीकरण, अभिलेख सुस्थितीत लावून घेणे, त्याच्या नोंदी संगणकात करवून घेणे असे किचकट व वेळ लागणारे काम पूर्ण करवून घेणेत आले होते. श्री.हुदली यांनी माहिती अधिकारांतर्गत माहिती मिळणेसाठी दि.१३.२.२००६ रोजी कार्यालयात अर्ज सादर केला होता. तथापी त्यांनी मागितलेली माहिती व्यापक स्वरुपाची असलेने व संबंधित धारिका आढळ होत नसल्याने त्यांना माहिती पुरविणेस्तव मुदत मिळणेकामी कार्यालयाकडून दि.१६.३.२००६ व १.४.२००६ चे पत्राने विनंती केली होती. म्हणजेच त्यांचे अर्जाची त्वरित दखल घेऊन कार्यवाही करण्यात आली होती,' असे श्री.ढिकले यांनी या पत्रात म्हटले आहे.

मोजणी संदर्भातील नकाशाच्या वेगवेगळ्या दोन प्रती देण्यात आल्याचे श्री.हुदली यांचे प्रतिनिधी श्री.शेख यांनी निदर्शनास आणले. न्यायालयात या संदर्भात दाखल असलेल्या दाव्यात सादर केलेल्या नकाशावर तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख यांच्या वतीने आवक-जावक लिपिक श्री.ए.ए.दबडे यांची सही आहे. मूळ अभिलेखात मात्र सही नाही. त्यामुळे न्यायालयात चुकीचे कागदपत्र दाखल करुन माहितीबाबत दिशाभूल करण्यात आली आहे, असेही प्रतिपादन श्री.शेख यांनी केले. नकाशाच्या प्रतीव्यतिरिक्तची संबंधित माहिती आपल्याला मिळाल्याचे त्यांनी मान्य केले.

मोजणी नकाशाप्रमाणे प्रॉपर्टी कार्डाला नाव लागावे ही श्री.हुदली यांची मूळ मागणी आहे. ही मागणी प्रशासकीय कार्यवाहीची असून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेतील नाही.

माहिती देण्यास श्री.ढिकले यांना ७५ दिवस विलंब झाला आहे. त्यांचा खुलासा, व कागदपत्रे शोधण्यासाठी त्यांनी प्रयत्न केल्याचे विद्यमान जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचे निवेदन विचारात घेतले तरी, तसेच दोन वेळा मुदत मागूनही अपिलीय

प्राधिकाऱ्यांच्या फौजदारी कारवाईच्या इशाऱ्यापर्यंत अभिलेख प्राप्त झालेले नाहीत, हे लक्षात घेता विलंबाचे समर्थन पूर्णपणे मान्य करता येणार नाही. दोन वेळा मागणी केलेली १५-१५ दिवसांची मुदत ग्राह्य मानली तरी व अन्य कामाचा ताण लक्षात घेऊन आणखी १५ दिवस मुदत दिली तरी किमान ३० दिवस विलंब राहतोच व तो समर्थनीय नाही. हा कालावधी शास्तीस पात्र राहील.

उभय बाजूंची निवेदने, सादर करण्यात आलेली कागदपत्रे यांचा विचार करता आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अंशतः मान्य.

(२) मूळ अभिलेखानुसार मोजणी नकाशाची प्रत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास निःशुल्क द्यावी.

(३) तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.संजय ढिकले यांनी माहिती देण्यास लावलेल्या ७५ दिवसाच्या विलंबातील ४५ दिवस क्षमापित करण्यात येत असून ऊर्वरित ३० दिवसांसाठी प्रतिदिन रुपये २५०/- प्रमाणे रुपये ७५००/- शास्ती त्यांना लावण्यात येत आहे. ही शास्ती त्यांच्या जुलै महिन्यात मिळणाऱ्या जून महिन्याच्या पगारातून वसूल करुन ती दि.१०.७.२००८ पर्यंत '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७००१६१)' या लेखाशिर्षाखाली जमा करणाची कार्यवाही जिल्हा अधीक्षक, भूमी अभिलेख, मुंबई उपनगर जिल्हा, नवीन प्रशासकीय इमारत, दहावा मजला, बांद्रा शासकीय वसाहत, बांद्रा (पूर्व), मुंबई यांनी करुन, व त्यांच्या गोपनीय अहवाल व सेवापुस्तकात याबाबत नोंदी घेऊन त्याचा पूर्तता अहवाल आयोगाला दि. १५.७.२००८ पर्यंत सादर करावा.

**(विजय कुंवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २७.५.२००८**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. किशोर टी. भिडे
सर्व्हे क्र.४७, प्लॉट क्र.९०२, वार्ड क्र.३,
सुनितानगर, वडगावशेरी, पुणे-१४ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा
कार्यकारी अभियंता, छोटे पाटबंधारे विभाग,
जिल्हा परिषद, पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** छोटे पाटबंधारे विभाग,
जिल्हा परिषद, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९७१ / पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | २५.४.२००७ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | ३.५.२००७ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | १३.६.२००७ |
| ५ | अपिलीय प्राधिकाऱ्यांने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ६ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>सन २००६.२००७ या वित्तिय वर्षातील टेंडर /निविदा बाबत तपशील | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. किशोर टी. भिडे यांनी सन २००६-२००७ या वित्तिय वर्षातील टेंडर / निविदाच्या अनुषंगाने एकूण ५ मुद्दयांची माहिती मागितली होती. प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने श्री. भिडे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केले आहे.

आयोगाकडे प्राप्त अपिलांच्या अनुषंगाने आयोगाने दि. २७.११.२००७ रोजीच्या पत्रान्वये सर्व संबंधितांना अपिलांच्या सद्यस्थितीबाबत विचारणा केली होती. आपल्याला आवश्यक माहिती मिळाल्याने समाधान झाल्यामुळे अपील निकाली काढण्याबाबत अपीलकर्ता श्री. भिडे यांनी दि. १०.१२.२००७ रोजीच्या पत्रान्वये कार्यकारी अभियंता, छोटे पाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, पुणे यांना कळविले होते. सदर कार्यालयाने या पत्राची प्रत दि. १६.२.२००८ च्या पत्रान्वये आयोगास सादर केली आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

( विजय कुंवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ०६.०५.२००८

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

क्र.अपील/पुणे/४१३/२००६/
राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे १.
दुरध्वनी : २६०५०६३२-३३/२६०५०५८०
फॅक्स क्रमांक : २६०५०६३२
दिनांक :- 03.०५.२००८

प्रति,

श्री.नंदकुमार विठ्ठल हरपळे,
जिजामाता वसाहत, विठ्ठलनगर, सातववाडी,
जुना प्रभाग (हडपसर ख.वि.सं.भाजीपाला गोडाऊनजवळ)
मांजरी फाटा, हडपसर पुणे ४११ ०२८

**विषय :- अनधिकृत इंजिनिअरिंग्ज व मशिनरी कारखाना बंद करण्याबाबत व पाडण्याबाबत...**

संदर्भ :- आपला अर्ज दि.०८.११.२००६ रोजीचे पत्र

महोदय,

आपले विषयाधिन अपीलाची तपासणी केली असता प्रस्तुत अपीलाचा विषय माहिती अधिकारासंबंधीत येत नाही. यास्तव आपले अपील निकाली काढण्यात येत आहे, असे आपणास कळविण्याचे मा.राज्य माहिती आयुक्त, पुणे खंडपीठ यांचे निर्देश आहेत.

आपला,

(रविंद्र एस. जमताप)
उप सचिव,
राज्य माहिती आयोग महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

-२-